दिव्यांग सक्षमीकरण विभाग,
३१,३२,३५ ए, मित्तल टॉवर, ए-विंग, तिसरा मजला,
बॅरिस्टर रजनी पटेल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई-०२१

**ई-मेल :** vishnudas.ghodke@nic.in **दूरध्वनी क्र.:-०२२ ४०१४५१७६**

---

**क्रमांक** :इडीडी-२०१८/प्र.क्र.५९/दि.क.१ **(ई-८३९०९९)** **दिनांक**: ०३ जून, २०२६.

**प्रति,**

आयुक्त,
दिव्यांग सक्षमीकरण, पुणे.

**विषय**:- शासन निर्णय दि.०६ नोव्हेंबर, २०१८ अन्वये ५० टक्के वेतन अनुदान प्राप्त दिव्यांगांसाठीच्या १२१ विशेष उपक्रमांना १०० टक्के वेतन अनुदान मिळणेबाबत.

**संदर्भ**:- १) शासन समक्रमांक दि.२४ मार्च, २०२६ व दि.३० मार्च, २०२६ रोजीचे पत्र,
२) मा.मंत्री ( दिव्यांग सक्षमीकरण ) यांच्या दि.०६ मे, २०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त दि.२१ मे, २०२६.
३) सचिव, दिव्यांग सक्षमीकरण विभाग यांनी दिलेले निर्देश.

**महोदय,**

विषयांकित प्रकरणी संदर्भाधीन पत्रे व इतिवृत्त कृपया पहावे.

०२. दि.०६ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे, १२१ उपक्रमांना ५० टक्के वेतन अनुदानावर मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. वित्त विभागाच्या निर्देशानुसार सदर १२१ उपक्रमांना १०० टक्के वेतन अनुदान मिळणेसंदर्भात शासन निर्णय दि.१६ जुलै, २०२४ मधील तरतुदींनुसार तपासणी करुन त्यासंदर्भातील अहवाल सादर करण्यासंदर्भात वारंवार सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार आपल्या कार्यालयाकडून केवळ ७४ उपक्रमांसंदर्भातील प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर ७४ उपक्रमांना १०० टक्के वेतन अनुदान मिळण्याबाबत प्रस्ताव अमान्य केल्याचे संदर्भ क्र.१ येथील पत्रान्वये आयुक्तालयामार्फत सर्व संबंधित संस्थांना अवगत केले आहे. तथापि, मा.मंत्री (दिव्यांग सक्षमीकरण) महोदयांच्या निर्देशानुसार सदर संस्थांबाबत राज्यस्तरीय तपासणी समितीने अपात्र केलेल्या ७४ उपक्रमांना उपस्थित केलेल्या त्रुटींची पूर्तता करण्यासंदर्भात जिल्हा कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

०३. सदर प्रकरणी आपणांस कळविण्यात येत आहे की, सर्व १२१ उपक्रमांना १०० टक्के वेतन अनुदान मिळण्याबाबतचा प्रस्ताव एकत्रित वित्त विभागास जाणे आवश्यक आहे. तरी उर्वरित ४७ उपक्रमांबाबत अनुदान धोरणातील तरतुदींनुसार शेवटची संधी म्हणून १० दिवसांत प्रस्ताव सादर करण्यासदंर्भात प्रत्येक संस्थेला तात्काळ पोचदेय डाकेने कळवावे. तसेच सदर प्रस्ताव विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास संबंधित उपक्रम बंद असल्याची किंवा अनुदान धोरणातील निकषांची पूर्तता करीत

नसल्याचे गृहीत धरुन त्यांना १०० टक्के वेतन अनुदानासाठी अपात्र ठरविण्यात येईल, याबाबतही त्यांना अवगत करावे.

०४. तद्नंतर विहित मुदतीत प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने सोबतच्या प्रपत्रामधील नमूद कागदपत्रांसहितचा परिपूर्ण अहवाल पत्राच्या दिनांकापासून पुढील १० दिवसांच्या मुदतीत शासनास सादर करावा, ही विनंती. विहित मुदतीत शासनास प्रस्ताव प्राप्त न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहील.

**सोबत** :-वरिलप्रमाणे.

आपला,

Digitally signed by
VISHNUDAS PUNDLIKRAO GHODKE
Date: 03-06-2026 14:54:46

**( वि. पुं. घोडके )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

# प्रपत्र

1. संस्थेचे व उपक्रमाचे नांव:-

| अ.क्र | माहितीचा तपशील | कागदपत्रांचा अनुक्रमांक |
|---|---|---|
| १. | २. | ३. |
| १. | वैध नोंदणी प्रमाणपत्र | |
| २. | जिल्हा मुल्यांकन समिती अहवाल | |
| ३. | छाननी समिती अहवाल | |
| ४. | विद्यार्थ्यांचे पटनिर्धारण व कर्मचारी संच मान्यता अहवाल (सन-२०२५-२६) | |
| ५. | जिल्हा कार्यालयाने प्रमाणित केलेली विद्यार्थी व कर्मचारी यांची मागील तीन महिन्यांची आधार संलग्न ऑनलाईन बायोमेट्रीक उपस्थिती अहवाल | |
| ६. | युडायस प्लस पोर्टलवरील नोंदणीकृत विद्यार्थ्यांची वैध युडीआयडी कार्डची संख्या | |
| ७. | युडायस प्लस पोर्टलवरील नोंदणीकृत विद्यार्थ्यांची वैध आधार कार्डची संख्या | |
| ८. | मागील ३ वर्षांचे अंकेक्षण (ऑडिट) अहवाल | |
| ९. | संस्थेची घटना, | |
| १०. | धर्मादाय आयुक्तांनी प्रमाणित केलेली सदस्यांची पदनिहाय यादी | |
| ११. | पदभरती करताना नियुक्तीची शासकीय कार्यपद्धती व आरक्षण धोरणाचे पालन करण्यात आल्याचे प्रमाणपत्र (जिल्हा कार्यालयाने प्रमाणित केलेले) | |